REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 9 | JUNE - 2018

# विठ्ठलमूर्तीचे स्थलांतरण

डॉ. गणेश मालधुरे
एस.एस.एन.जे. महाविद्यालय, देवळी, जि. वर्धा.



मराठी वाङ्मय इतिहासातील एक प्रधान समस्या अद्यापही नीटपणे उकलल्या गेलेली नाही. प्राधान्याने वारकरी परंपरेतील सर्व संशोधक, संत वाङमयाचे अभ्यासक आणि मराठी वाङ्मय इतिहासकार जेव्हा केव्हा श्री पंढरपूर व विठ्ठलविषयक विवेचन करतात तेव्हा ते विजयनगरला विठ्ठलाची मूर्ति नेण्यात आली होती काय आणि ती पुन्हा संत एकनाथ महाराजांचे पणजे श्री भानुदास महाराज यांनी वापस आणली काय? याची आवर्जून दखल घेतात. थोडी फार चर्चा करतात, पण मूळ प्रश्नांची नीट उकल करीत नाहीत. महाराष्ट्र सारस्वतकार वि. ल.भावे, डॉ.शं.गो.तुळपुळे, ल. रा. पांगारकर, 'वारकरी संप्रदायाचा उदय आणि विकास' या ग्रंथाचे कर्ते भालचंद्र पंढरीनाथ बहिरट आणि डॉ. म. रा. जोशी यांनी यावर आजवर विवेचन केलेले आहे; पण निश्चित रूपाने याच्यावर निर्णायक स्वरूपाचे विचार व्यक्त केले गेले नाही. संभवनीयता मात्र दाखवली. याशिवाय सुप्रसिद्ध इतिहासकार ग. ह. खरे यांनी हा प्रश्न हाताळला. त्यांनी असे नमूद केले की विठ्ठलाची मूर्ति पंढरपूरवरून विजयनगरला नेण्यात आली, ही संभवनीयता अधिक आहे व त्याच्या मागे इतिहासही आहे. पण त्याचबरोबर असेही नमूद केले की विजयनगर सम्राट श्रीकृष्ण देवराव याने ही मूर्ति विजयनगरला नेली असावी. परंतु भानुदासाने आणलेली मूर्ति ही मूळ मूर्ती होती काय? हे निश्चितपणे सांगता येत नाही. ते असेही म्हणतात की, विठोबाची मूर्ती विजयनगरात गेली असावी पण तेथून ती परत आणली गेली हे निश्चित नाही. ते असे म्हणतात की 'शके १४३२ ते १४५१ पर्यंत विजयनगरी तयार होऊन अत्यंत पराक्रमी राजा कृष्णराय यांचे बाबतीत उपर्युक्त प्रसंग झाला असल्याचा संभव आहे. कारण त्याने इतर ठिकाणाहून पूजनीय मूर्ती आणून त्यांची विजयनगरात स्थापना केल्याबद्दल भरपूर पुरावा सापडतो. तेव्हा या बाबतीत अधिक विचार केला पाहिजे.

या प्रकरणी विजयनगरच्या विजयविठ्ठल किंवा विठ्ठलस्वामींच्या देवळातील व इतर लेखातून या देवळाविषयी किंवा विठ्ठलाविषयी पुढील माहिती मिळते. व ती बाब विचार करण्यासारखी आहे यात शंका नाही.

मराठी वाङ्मय इतिहासकार, संत परंपरेचे अभ्यासक आणि ग.ह.खरे यांच्यासारख्या नामवंत इतिहासकाराने विठ्ठल मूर्ती व विजयनगरच्या संबंधाचा प्रश्न डावलला नाही. किंवा हा प्रश्न अद्यापही समाधानकारक रितीने सुटलेला नाही. या प्रश्नांच्या संबंधात पुढील घटना व प्रसंग लक्षणीय आहेत.

१) भानुदास महाराज यांनी विजयनगरहून मूर्ति आणली काय? आणली असल्यास ती केव्हा आणली?
२) मंदिरात स्थापन केलेली मूर्ति मंदीरातून विजयनगरला नेणारा राजा किंवा व्यक्ती कोण होता?
३) मूर्ति जर खरोखर नेण्यात आली असेल तर ती कोणी व केव्हा नेली?

४) विठ्ठलाच्या मूर्ति स्थित्यंतराशी विजयनगर हे नाव कसे निगडीत झाले?
५) मूर्ति स्थलांतराशी विजयनगर परिसरात काही उल्लेख आढळतात का?
६) वारकरी पंथात विठ्ठलाची मूर्ति विजयनगरला नेण्यात आली ही समजूत कशी प्रचलित झाली?
७) भानुदास व एकनाथ यांचा सहभाग खरोखर या कार्यात होता का?

वरील समस्येची उकल करतांना प्रथमत: विजयनगर सम्राट कृष्णदेवराय यांच्याविषयी दोन शब्द लिहिणे आवश्यक आहे. कृष्णदेवरावाची राजधानी हम्पी ही होती. हे शहर तुंगभद्रा नदीतिरावर आहे. या राजधानीत सर्व विजयनगर सम्राटांनी, ते सर्व धर्मनिष्ठ असल्यामुळे मोठमोठी मंदिरे बांधलेली आहेत. विशेषत: देवराव दुसरा याने इ.स. १४२२ ते १४४६ मध्ये मंदिरे बांधायला सुरूवात केली व तिच परंपरा कृष्णदेवरावने चालू ठेवली. विजयनगरच्या राज्यांनी प्रथमत: आपले उपास्यदैवत श्री शिव यांचे मंदीर उभारले. ते मंदीर श्रीविरूपाक्ष देव नावाने आजही प्रसिद्ध आहे. कृष्णदेवरायांनी या देवळाचा विस्तार केला. स्वत: त्यांनी बालकृष्णाची मूर्ति ओरिसावर स्वारी केल्यावर तेथून आणली होती. ते मंदीर त्यांनी शके १५५४ या साली बांधले होते. दुसरे मंदिर अनंत पद्मनाभ नावाचे आहे. हे मंदिर त्यांचे उपाध्याय श्री. रंगनाथ दीक्षित यांनी उभारले. तथापि या दोन–तिन मंदिरांशिवाय कृष्णदेवरायांची किर्ती जी आहे ती विठ्ठलेश्वर मंदिराबद्दल आहे. या मंदिराला १०० स्तंभ आहेत. हे मंदिर इ.स. १५५४ म्हणजे शके १४७६ मध्ये उभारले. कृष्णदेवराव हा इ.स. १५०९ मध्ये (शके १४२९) राज्यावर आला. त्यांचा मृत्यू इ.स. १५२९ (शके १४५१) चा आहे. त्यांनी बांधलेले विठ्ठलेश्वराचे मंदिर आजही आहे. कृष्णदेवराव नंतर अच्युतराव आणि सदाशिवराव हे राज्यावर आले. ह्या तीनही राजांनी विठ्ठलेश्वर मंदिराला भरपूर दान दिले. तसेच त्यांचे शिलालेखही आहेत. सदाशिवराव नंतर काही वर्षांनी मुसलमानांनी आक्रमण करून सर्वच मंदिराचा (इ.स. १५६५) ला विध्वंस केला. त्यांची झळ विठ्ठलेश्वर मंदिरालाही लागली. या मंदिरात आज विठ्ठलेश्वराची मूर्ति नाही. आक्रमकांनी ती मूर्ति नष्ट केली किंवा ती मूर्ति फेकून दिली, याचा काहीही पत्ता लागत नाही. याचसंबंधी डॉ. म. रा. जोशींचे असे अनुमान आहे की मुस्लीम आक्रमक मंदिरावर चाल करून येत आहे ही वार्ता ऐकून पूजाऱ्याने बहुधा ही मूर्ति एकतर जमिनीत सुरक्षित लपवून ठेवली असावी किंवा विहिरीत किंवा तलावात विसर्जीत केली असावी. या दिशेने शोध घेणे आवश्यक आहे. मुस्लिम आक्रमणाच्या वेळी मूर्ती लपवून ठेवल्याची अनेक उदाहरणे दिसून येतात. खुद्द पंढरपूरवर मुस्लिमांचे आक्रमण झाले असतांना बडव्यांनी विठ्ठलाची मुर्ती लपवून ठेवली व ती सुरक्षित राहीली हे इतिहास सांगते.

इ.स. १५६५ (शके १४८७) ला मुस्लिमांचे आक्रमण झाले. शके १४८७ पर्यंत विठ्ठलाची मूर्ति विजयनगर मंदिरात होती यावेळी भानुदास महारांजांचे पणतु एकनाथ महाराज हे काशीला भागवत लिहित होते. भानुदास हे एकनाथ महाराजांचे पणजे होते आणि एकनाथ हे त्यांचे पणतू आहेत. भानुदास–चक्रपाणी–सूर्यनारायण–एकनाथ अश्या या चार पिढ्या आहेत. पणजोबा आणि पणतु या दोघांच्या वयात ६०–६५ वयाचे अंतर सहज असेल. एकनाथ शके १५२१ फाल्गुन वद्य षष्ठीला समाधिस्त झाले. म्हणजे शके १५२१–६५ म्हणजे १४५६ यावेळेस भानुदास महाराजांचा अखेरचा काळ आहे. विठ्ठलमूर्ति जर आणलीच असेल तर ती शके १४५० ते १४५६ च्या दरम्यान आणली असावी. याउलट विठ्ठलेश्वराच्या मंदिरात विठ्ठलाची मूर्ति इ.स. १५६५ म्हणजे शके १४८७ पर्यंत होती. म्हणजे भानुदासांच्या मृत्यूनंतर ३६ वर्षेपर्यंत विठ्ठलाची मूर्ति विजयनगरलाच होती. तेव्हा भानुदासांनी विठ्ठलेश्वराची मूर्ति आणणे संभवनीय नाही.

भानुदास महाराजांचा अखेरचा काळ शके १४५६ तर विजयनगरला विठ्ठलेश्वराचे मंदिर कृष्णदेवरायाने १४५१ मध्ये स्थापन केले तर मूर्ति मुस्लिमांच्या आक्रमणापर्यंत म्हणजे १४८७ पर्यंत होती. म्हणजे कृष्णदेवरावाकडून विठ्ठलाची मूर्ति भानुदास महाराजांना मिळणे संभवनीय नाही. वरील स्थिती पाहता कृष्णदेवरावाने ही मूर्ति पंढरपूरवरुन विजयनगरला नेली व तिच मूर्ति विठ्ठलेश्वर मंदिरात स्थापन केली ही गोष्ट शक्य नाही.

तेव्हा या समस्येचा विचार करतांना दुसरा एक मुद्दा लक्षात घेतला पाहिजे तो हा की महीपती महाराज हे बोलतात की भानुदासाने विठ्ठलाची मूर्ति अनागोंदी वरुन आणली. अनागोंदी हे गाव हम्पी विजयनगरहून पाच कि.मी. अंतरावर आहे. तेव्हा एक शक्यता अशी की पंढरपूरहून विजयनगरला नेलेली विठ्ठलाची मूर्ति विजयनगरच्या राजाने हम्पीच्या विठ्ठलेश्वर मंदिरात न स्थापन करता ती हम्पी पासून पाच मैलावर असलेल्या अनागोंदी या गावी नेऊन ठेवली असावी आणि तेथून भानुदास महाराजांनी आणली हे प्रमेय स्वीकारतांना काही अडचणींना तोंड द्यावे लागते. ते असे —

एकनाथ महाराजांचा कालखंड शके १४५५ ते शके १४२१ असा आहे. त्यांचे प्रारंभीचे शिक्षण पैठणला झाले. ते जनार्दन स्वामींकडे शिक्षणाला गेले व तेथे अंदाजे १२ वर्षे राहिले. एकनाथांचे आई—वडिल त्यांचे बालपणीच गेले होते. त्यांचे पालनपोषण आजोबा चक्रपाणी यांनी केले. बालवयाच्या एकनाथाला वयाच्या शके १४६२ ते १४६३ च्या सुमारास त्यांच्या आजोबाने एकनाथांना देवगिरी किल्ल्यावर जनार्दन स्वामींकडे नेले आहे. अशा तऱ्हेने एकनाथ महाराजांच्या शिक्षणाला प्रारंभ झाला. ८ ते १० वर्षे जनार्दन स्वामींकडे शिक्षणाचे धडे घेतल्यानंतर तरुण वयाचे एकनाथ यांना घेऊन जनार्दन स्वामी त्र्यंबकेश्वरला गेले. मार्गामध्ये चांदवड या गावी चंद्रभट या ब्राम्हणाकडे त्यांचा मुक्काम झाला व त्यांच्या मुखातून भागवतावरील प्रवचन ऐकले व ते प्रवचन ऐकून जनार्दन स्वामींनी एकनाथांना भागवताच्या चतु:श्लोकावर टीका लिहिण्यास सांगितले. ही घटना आहे शके १४७२—७३ ची. येथून एकनाथांच्या गंथलेखनाला सुरूवात झाली. भागवताचे पहिले पाच अध्याय लिहून झाल्याबरोबर एकनाथ महाराज काशीला गेले. तेथे त्यांनी रुक्मिणी स्वयंवर व एकनाथी भागवत पूर्ण केले. हे दोन्ही ग्रंथ शके १४९४—९५ मध्ये पूर्ण झाले. पुढे एकनाथ महाराज पैठणला आले व गुरुच्या आज्ञेनुसार वारकरी संप्रदायाचे काम करू लागले. शके १५०६ मध्ये त्यांनी ज्ञानेश्वरी संशोधन पूर्ण केले व त्यानंतर भावार्थ रामायणाला प्रारंभ केला पण तो ग्रंथ ते पूर्ण करू शकले नाही. भावार्थ रामायणाच्या युध्दकांडाचे ४५ अध्याय पूर्ण होताच एकनाथांचा अवतार पूर्ण झाला. फाल्गून वद्य षष्ठी शके १५२१ ला एकनाथ महाराज समाधीस्त झाले. तत्पूर्वी त्यांचे गुरु जनार्दनस्वामी हे फाल्गून वद्य षष्ठी १४९८ मध्येच समाधीस्त झाले. जनार्दनस्वामी हे थोर भगवतभक्त होते. इ.स. १६०० मध्ये निजामाची राजधानी अहमदनगर हे शहर मोगलांनी घेतले. इ. स. १६०० म्हणजे शके १५२२ ज्यावेळी ते निजामशाहीच्या नोकरीत होते. तेथे विजापूरची आदीलशाही या दोघांमध्ये युध्द झाले. हे युध्द शके १४२६ मध्ये झाले. त्यावेळी जनार्दनस्वामींनी मोठा पराक्रम केला. त्याचवेळी जखमी झाले असतांना दत्तात्रेय नृसिंह सरस्वतींने त्यांना दर्शन दिले. यानंतर लवकरच त्यांची नेमणूक निजामशहाने दौलताबादच्या किल्ल्यावर केली. शके १४२६ ते १४९८ असे सुमारे ६०—६२ वर्षे ते किल्लेदार होते. याचकाळात विजापूरवर निजामशहा व इतर चौघांनी हल्ला करून विजापूर नगर नष्ट केले. ही घटना शके १४८५ ते ८६ ची आहे. त्यावेळी एकनाथ महाराज काशीला होते. सर्व कालानुक्रम पाहिला तर शके १४८७ मध्ये विजयनगरचा विध्वंस होईपर्यंत हम्पीला विठ्ठलेश्वराच्या विठ्ठलाची मूर्ति होती हे स्पष्ट होते. शके १४६३ मध्ये बालवयाच्या एकनाथांना त्यांचे आजोबा चक्रपाणी हे एकनाथांना घेऊन जनार्दनस्वामींकडे जातात त्याअर्थी शके १४६३ च्या सुमारास विठ्ठलेश्वराची मूर्ति विजयनगरला होती. १४६३ ला एकनाथांचे आजोबा होते पण पणजोबा भानुदास महाराज नव्हते. म्हणजेच भानुदास महाराजांच्या हयातीत विठ्ठलाची मूर्ति ही विजयनगरलाच होती हे स्पष्ट होते. याशिवाय भानुदासांच्या हयातीत यदाकदाचित पंढरपूरहून विठ्ठलाची मूर्ती नेली असेल असे समजण्यास कोणताही सबळ पुरावा नाही.

भानुदास महाराजाच्या वेळी महाराष्ट्रामध्ये एक फार मोठे संत होऊन गेले. त्यांचे नाव चांगामुधेश. हे मोठे भगवतभक्त व योगीपुरूष होते. तसेच ते विठ्ठलाचे परमभक्तही होते. ते एकदा द्वारकेला तीर्थयात्रेला गेले तेथून वापस आल्यानंतर त्यांना असे कळले की बिदरच्या बादशहाने पंढरपूरवर आक्रमण करून पंढरपूरच्या मंदीराचा विध्वंस केला. या प्रसंगाचे वर्णन त्यांच्या परंपरेतील एका कवीने केले आहे ते असे —

**''बेदरीचा राजा बमणी पातशहा । ब्राह्मणासी बहू छळियेले ।।५२।।**
**हिंदूधर्म जितुके तितुके वर्जियेले । राउळ विध्वंसिले पंढरीचे ।।५३।।**
**केलीसे मशीद महाद्वार मोडून । सात मास पूर्ण झालेयासी ।।५४।।**

**मूर्ती सिंहासनाहुनि आच्छादिली । गुप्त हो ठेविली बडव्यांनी ।।५५।।**
**पुरातन स्थळ आमुचे पंढरपूर । मोडूनि महाद्वार मशीद केले ।।९३।।**

हे ऐकल्यावर त्यास वाटले काय तर ,

**मोडून मशीद देऊळ स्थापावें । पहिले होते तैसे बरवे जैसे ।।९४।।**

या इच्छेप्रमाणे त्यांनी विठ्ठलाचे देऊळ अंशत: उभे केले असावे असे कोणा अनामकाने केलेल्या पुढील श्लोकावरून वाटते.

**‘‘ चांगदेवेति विख्यातगोदातीरनिवासिना ।**
**श्रीमद्‌विठ्ठलनाथस्य नेमं देवालये कृतम ।। ’’**

चांगामुधेश यांच्या हकीकतीवरून हे स्पष्ट होते की बिदरच्या सुलतानाने पंढरपूरवर हल्ला करून मंदिराचा विध्वंस केला. पण बडव्यांनी विठ्ठलाची मूर्ति लपवून ठेवल्यामुळे मूर्ति सुरक्षित राहिली. पुढे चांगामुधेश हे स्वत: बिदरला गेले आणि बादशहाच्या बेगमला आजारातून मुक्त केले तेव्हा बादशहाने संतुष्ट होऊन मंदिर उभारण्याची परवानगी दिली. त्याप्रमाणे चांगामुधेशनी विठ्ठलाचे मंदिर उभारले व मूर्ति स्थापन केली. बहुधा या कार्यक्रमाला विजयनगरहून विजय—विठ्ठलाची मूर्ति घेऊन येणारे भानुदास महाराज उपस्थित होते. पंढरपूरला भानुदासांनी आणलेली विठ्ठलाची मूर्ति आजही पैठणला एकनाथाच्या देवघरात आहे. हा सर्व इतिहास नीट माहीत नसल्यामुळे पारंपारीकाचा गोंधळ झालेला दिसतो. पंढरपूरच्या मंदिराचा विध्वंस होऊ नये म्हणून विठ्ठलमूर्ति मात्र बडव्यांनी लपवून ठेवल्यामुळे ती सुरक्षित राहिली व ती पुन्हा स्थापन करण्यांत आली.

### संदर्भ :

१) पंढरपूरचे सांस्कृतिक वैभव — प्रा. डॉ. जयश्री रणनवरे अक्षर लेण प्रकाशन सोलापूर प.आ. २००६.
२) श्री. विठ्ठल आणि पंढरपूर — लेखक प्रकाशक श्री. गणेश हरि खरे आवृत्ती २ री
३) वारकरी पंथ उदय व विकास भां. पं. बहिरट — व्हिनस प्रकाशन पुणे १९७२.
४) पंढरपूर आणि श्री विठ्ठल — शोभना गोखले महाराष्ट्राची सत्वधारा यात लेख समाविष्ट.